श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई – ४०००२८
S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 (Controlled by Govt. of Maharashtra)
Tel : 022 - 6249 1111, 022 - 6249 1112 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org
mahaprasad@siddhivinayak.org

## श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई..

---

## अल्पोपहार, नियमित भोजन, विशेष भोजन, चहा इ. बनविण्याच्या कामाचे साहित्यासह कंत्राट देण्याकरीता ई–निविदा मागविण्याबाबत.

---

### कंत्राटाचा कालावधी

### कार्यादेशाच्या दिनांकापासून एक वर्षाचा कालावधी

---

### : ई–निविदा सूचना :

मंदिरातील कर्मचाऱ्यांना सकाळचा अल्पोपहार, चहा आणि दुपारचे भोजन बनविण्याच्या कामाचे साहित्यासह कंत्राट देण्याकरीता ई– निविदा मागविण्यात येत आहेत. ई–निविदेबाबतची सविस्तर माहिती (अटी व शर्ती) तसेच निविदा अर्ज डाऊनलोड करण्यासाठी **www.mahatenders.gov.in** या संकेतस्थळावर किंवा **www.siddhivinayak.org** या न्यासाच्या अधिकृत वेबसाईटला भेट द्यावी.

| | | |
|---|---|---|
| ई निविदा प्रसिध्दीचा वार व दिनांक | :– | गुरूवार, दि. ३१/०७/२०२५ |
| निविदापुर्व बैठक दिनांक | :– | गुरूवार, दि. ०७/०८/२०२५, दु. ०३.००वा. |
| ई निविदा स्विकारण्याचा अंतिम दिनांक | :– | बुधवार, दि. २०/०८/२०२५, सायं.०५.००वा. |
| तांत्रिक निविदा उघडण्याचा दिनांक व वेळ | :– | शुक्रवार, दि. २२/०८/२०२५, दु. ०२.००वा. |
| मूल्य निविदा उघडण्याचा दिनांक व वेळ | :– | शुक्रवार, दि. २२/०८/२०२५, दु. ०३.००वा. |
| स्थळ | :– | श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, तिसरा मजला, समिती कक्ष न्यास कार्यालय. |

सही/–
(वीणा पाटील)
कार्यकारी अधिकारी

मंदिरातील कर्मचाऱ्यांना सकाळचा अल्पोपहार, चहा आणि दुपारचे भोजन बनविण्याच्या कामाचे साहित्यासह कंत्राट देण्याकरीता नामांकित कंत्राटदार यांच्याकडून ऑनलाईन ई–निविदा मागविण्याबाबत.

**अल्पोपहार, नियमित भोजन, विशेष भोजन, चहा इ. बनविण्याच्या कामाचे साहित्यासह कंत्राट देण्याकरीता ई–निविदा मागविण्याबाबत.**

---

**कंत्राटाचा कालावधी**

**कार्यादेशाच्या दिनांकापासून एक वर्षाचा कालावधी**

| अ. क्र. | तपशील | पान क्र. |
|---|---|---|
| १ | ई–निविदा मागविण्याबाबतची माहिती, सूचना, वार, दिनांक वेळ | |
| २ | निविदेची किंमत/ शुल्क व बयाना रक्कम याबाबतची माहिती | |
| ३ | पतदारी दाखला (Solvency certificate) व आर्थिक उलाढालीबाबतची माहिती | |
| ४ | निविदाधारकाने ऑनलाईन स्कॅन करून अपलोड करावयाची कागदपत्रे | |
| ५ | चहा व अल्पोपहार बनविण्याच्या कामाचा तपशील | |
| ६ | नियमित भोजन बनविण्याच्या कामाचा तपशील | |
| ७ | विशेष भोजन बनविण्याच्या कामाचा तपशील | |
| ८ | श्रीं चे नैवेद्य, हवन, श्रीसत्यनारायण पूजा व श्रीसत्यविनायक पूजा प्रसाद तपशील | |
| ९ | निविदाधारकाबाबतची माहिती ( फर्म/कंपनीच्या लेटरहेडवर) | |
| ९ | हमीपत्र (नमुना) | |
| १० | मागील तीन वर्षाची सरासरी आर्थिक उलाढाल नमूद असणारे सनदी लेखापालाचे पत्र | |
| ११ | निविदाधारकाने खालीलप्रमाणे प्रत्येक पानावर स्वाक्षरी व संस्थेचा शिक्का मारून लिफाफा क्र. १ तांत्रिक निविदा (Technical Bid) सोबत न्यासास सादर करावयाची कागदपत्रे. | |
| १२ | निविदाधारकाने ऑनलाईन स्कॅन करून अपलोड करावयाचे बीड ऑफ कोटेशनचा (BOQ) तपशील. | |
| १३ | ई –निविदा मागविण्याबाबतची माहिती | |
| १४ | अटी व शर्ती | |

## निविदा शुल्क व बयाणा रकमेबाबतचे जोडपत्र "अ"

| | | |
|---|---|---|
| १ | निविदा शुल्क | रू. १५,०००/– |
| २ | बयाना रक्कम | रू. १,५०,०००/– |
| ३ | पतदारी दाखला | रू. ४० लक्ष इतक्या रकमेचा पतदारी दाखला |
| ४ | आर्थिक उलाढाल | (३ आर्थिक वर्षाची सरासरी रक्कम)<br>रक्कम रू. किमान १ कोटी |

श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई – ४०००२८
S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 (Controlled by Govt. of Maharashtra)
Tel : 022 - 6249 1111, 022 - 6249 1112 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org
mahaprasad@siddhivinayak.org

## निविदाधारकाने ऑनलाईन स्कॅन करून अपलोड करावयाची कागदपत्रे

खालील तपशीलाप्रमाणे कागदपत्रे तांत्रिक निविदा (Technical Bid) ऑनलाईन स्कॅन करून अपलोड करावीत.

| अ. क्र. | अपलोड करावयाच्या कागदपत्रांचा तपशील |
|---|---|
| १ | ई–निविदेसोबत निविदेची किंमत/शुल्क जमा केल्याबाबतची इंटरनेट बॅंकेकडील पावती प्रत |
| २ | बयाणा रक्कम (EMD) जमा केल्याबाबतची इंटरनेट बॅंकेकडील पावतीची प्रत |
| ३ | कंपनी नोंदणी दाखला (Shop Act Licence)/उद्योग आधार–उद्यम प्रमाणपत्र (MSME) |
| ४ | आयकर नोंदणी (पॅन कार्ड) |
| ५ | कामगार भविष्य निर्वाह निधी संघटना नोंदणी प्रमाणपत्राची प्रत. |
| ६ | व्यवसाय कर नोंदणी प्रमाणपत्र प्रत |
| ७ | राज्य कामगार विमा नोंदणी प्रमाणपत्राची प्रत. |
| ८ | महाराष्ट्र राज्य कामगार कल्याण मंडळ प्रमाणपत्राची प्रत. |
| ९ | सेवाकर नोंदणी दाखला (GST Certificate) |
| १० | राष्ट्रीयकृत बॅंकेचा पतदारी दाखला (Solvency Certificate) |
| ११ | आर्थिक वर्ष (२०२२–२०२३, २०२३–२०२४, २०२४–२०२५) आयकर विवरणपत्र |
| १२ | आर्थिक वर्ष (२०२२–२०२३, २०२३–२०२४, २०२४–२०२५) सेवाकर विवरणपत्र |
| १३ | सन (२०२२–२०२३, २०२३–२०२४, २०२४–२०२५) या ३ वर्षाची सरासरी आर्थिक उलाढाल नमुद असणारे सनदी लेखापाल (Charterd Accountant) यांचे प्रमाणपत्र.<br>**टिप – ३ वर्षाची सरासरी आर्थिक उलाढाल १ कोटी पेक्षा जास्त असावी.** (म्हणजेच निविदाकाराची प्रतिवर्ष आर्थिक उलाढाल किमान १ कोटीपेक्षा जास्त असावी.) |
| १४ | (मागिल तीन वर्षापासून काम करीत असलेल्या कंपनी/संस्था अनुभवाचे प्रमाणपत्र)अनुभवाचा तपशील |
| १५ | गुन्हा दाखल अथवा न्यायालयीन प्रकरण सुरु नसल्याबाबत व काळया यादीत समावेश नसल्याबाबत स्वघोषणापत्र (रु. ५००/– च्या गैरन्यायीक/न्यायीक स्टॅम्प पेपरवर नोटरी करावे.) |
| १६ | हमी पत्र |
| १७ | निविदा उघडण्याच्यावेळी कंपनी/संस्थेमार्फत पाठविण्यात आलेल्या प्रतिनिधी संदर्भात त्याचे नांवाचे प्राधिकार पत्राची प्रत. (Authorisation letter) |
| १८ | मुळ निविदा (वाणिज्यिक Commercial) BOQ |
| १९ | अन्न व औषध प्रशासन यांचेकडील नोंदणीप्रमाणपत्राची प्रत तसेच यांसदर्भात आवश्यक त्या परवानगीची प्रत. |

# चहा व नाष्टा (अल्पोपहार) बनविण्याच्या कामाचा तपशील

**चहा** :– दररोज सकाळी व संध्याकाळी ४५० व्यक्ती

**अल्पोपहार** :– १. दररोज सकाळी २२५ ते २५० व्यक्ती
(अमर्यादीत) २. हवनादिवशी २५ ते ३० व्यक्ती

## नाष्ट्याकरीता (अल्पोपहार) पदार्थ

१. कांदे पोहे
२. उपमा
३. मिसळ पाव
४. खमण ढोकळा (मिरची व कोथिंबीर चटणी)
५. समोसा/ बटाटा वडा/ डाळ वडा/ कटलेट/ दोन भजी/कोथंबीर वडी इ. (सोबत मिरची कोथिंबीर मिक्स् चटणी व गोड चटणी)
६. मेदु वडा सांबर
७. इडली सांबर
८. उपवासाच्या दिवशी :– साबुदाणा वडा व साबुदाणा खिचडी/ रताळे व रताळयांचा कीस इ.(सोबत खोबऱ्याची चटणी)

वरीलप्रमाणे कोणताही एखादा पदार्थ बनविल्यानंतर परत तोच पदार्थ एक आठवडयानंतर किंवा सर्व पदार्थ क्रमाने अथवा महाप्रसाद विभागाने दिलेल्या सुचनेनुसार बनवावे लागतील.

# नियमित भोजन बनविण्याच्या कामाचा तपशील

**दुपारचे भोजन** (अमर्यादित) :— (दररोज एकूण २५० व्यक्तींकरिता)

## नियमित दुपारच्या भोजनातील पदार्थ

१. एक सुकी भाजी :— बटाटा/ भेंडी/ दुधी/ सुरण/पालेभाजी/ झुणका/ मूग/ मटकी/ मटर/ कोणतीही फळ भाजी ई.

२. एक रस्सा भाजी :— डाळींबी/ पनीर/ मटकी/ काजू/ छोले/ मटर/ चणा/ चवळी/ मूग/ राजमा/ कुर्मा/ कोल्हापूरी/ काळा/ हिरवा/ सफेद वाटाणा/ कोणतीही फळभाजी ई.

३. डाळ/आमटी

४. भात

५. चपाती/पुरी

६. पापड, लोणचे, सलाड

७. दही/ताक

८. गोड पदार्थ (तांदळाची खीर/ शेवयाची खीर/ शिरा/ लापशी इ.) मंगळवार, विनायकी व संकष्टी चतुर्थी करिता

# विशेष भोजन बनविण्याच्या कामाचा तपशील

**विशेष भोजन** :–
१. हवन पूजेकरिता एकूण २५ ते ३० व्यक्ती (अमर्यादित)
२. माघ महोत्सव :– श्री गणेश जयंती व रथसप्तमी या दोन दिवशी १००० ते १२०० व्यक्ती तसेच उर्वरित दिवशी ६५० ते ७५०व्यक्ती
३. सर्व हिंदू सणांदिवशी २५० ते २७५ व्यक्ती

## विशेष भोजनातील पदार्थ

१. एक सुकी भाजी :– बटाटा/ भेंडी/ दुधी/ सुरण/पालेभाजी/ झुणका/ मूग/ मटकी/ मटर/ कोणतीही फळ भाजी ई.
२. रस्सा भाजी :– डाळींबी/ पनीर/ मटकी/ काजू/ छोले/ मटर/ चणा/ चवळी/ मूग/ राजमा/कुर्मा/ कोल्हापूरी/ काळा/ हिरवा/ सफेद वाटाणा/ कोणतीही एक फळभाजी ई.
३. चपाती/पुरी
४. डाळ/आमटी
५. साधा भात, मसाले भात/पुलाव
६. फरसाण पदार्थ :– कोथंबीर वडी/ आळूवडी/ समोसा/ बटाटा वडा/ कटलेट/ दोन भजी पदार्थ ई
७. पापड, लोणचे, सलाड
८. दही/ताक
९. गोड पदार्थ (गुलाबजाम/ आम्रखंड/ श्रीखंड/ आमरस/ बासुंदी/ उकडीचे मोदक/ हलवा (गाजर/दुधी)/ पुरणपोळी इ.)

टीप : उक्त नमुद कामासंदर्भात होऊ शकणाऱ्या कामातील बदल विचारात घेऊन न्यासाच्या आवश्यकतेनुसार कंत्राटदारास कामाची पूर्तता करावी लागेल. अंगारक संकष्ट चतुर्थी, मंदिरात होणारे उत्सव/कार्यक्रमांदिवशी महाप्रसाद विभागाने दिलेल्या सूचनेनुसार वाढीव संख्येनुसार पदार्थ बनवावे लागतील.

श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई – ४०००२८
S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 (Controlled by Govt. of Maharashtra)
Tel : 022 - 6249 1111, 022 - 6249 1112 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org
mahaprasad@siddhivinayak.org

## "श्रीं" चे नैवेद्य, हवन, श्रीसत्यनारायण पूजा व श्रीसत्यविनायक पूजा याकरीता प्रसाद

१. **श्रीं च्या नैवेद्याकरिता** :– दररोज उकडीचे ५१ नग मोदक

२. **हवन** :– प्रति हवन तळलेले लहान आकाराचे ११०० नग मोदक

**(प्रतिवर्ष अंदाजे ५० हवन)**

३. **श्रीसत्यनारायण पूजा** :– प्रति पूजा सव्वा किलो रव्याचा शिरा

**(प्रतिवर्ष अंदाजे ४०० पूजा)**

४. **श्रीसत्यविनायक पूजा** :– प्रति पूजा तळलेले मध्यम आकाराचे २१ नग मोदक (उकडीच्या मोदकाच्या आकाराचे)

**(प्रतिवर्ष अंदाजे ६० पूजा)**

(फर्म/कंपनीच्या लेटरहेडवर)

## निविदाधारकाबाबतची माहिती

**१) संस्थेचे/फर्मचे नांव/व्यक्तीचे नांव** :——————————————

अ. पत्रव्यवहारासाठी संपूर्ण पत्ता :——————————————

——————————————

——————————————

**ब.** दूरध्वनी क्र. :——————————————

**क.** भ्रमणध्वनी (मोबाईल) :——————————————

**ड.** फॅक्स क्र. :——————————————

**इ.** ई–मेल :——————————————

**२) संपर्कासाठी व्यक्तीचे नांव (हुद्दयासह)** :——————————————

**अ.** भ्रमणध्वनी (मोबाईल) :——————————————

**३) सद्या कार्य सुरू असलेल्या संस्थेचे नांव व पत्ता** :——————————————

——————————————

——————————————

**४) जीएसटी नोंदणी क्र.** :——————————————

**५) आयकर नोंदणी पॅन क्र.** :——————————————

निविदाधारकाची सही व शिक्का

(फर्म / कंपनीच्या लेटरहेडवर)

## हमीपत्र

दिनांक – / /२०२५

**प्रति,**
कार्यकारी अधिकारी,
श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास,
प्रभादेवी, मुंबई – ४०००२८

मी/आम्ही ———————————————————————————— खालील निम्न स्वाक्षरीकार याद्वारे घोषित करतो की,

१. मी/आम्ही कागदपत्रे, अटी व शर्ती, अन्य बाबी तपासून त्याबाबत खात्री केली असून या विषयी आमची कोणतीही शंका नाही.

२. निविदा अटी – शर्ती नुसार चहा, नाष्टा (अल्पोपहार), नियमित भोजन, विशेष भोजन इ. सुस्थितीत व ताजे बनविण्याचे काम आम्ही निविदा व वाटाघाटीनंतर कायम केलेल्या दराने कोणताही वाद न करता कंत्राट कालावधीत करू.

३. मी/आम्ही नमूद केलेल्या दरामध्ये सेवाकर वगळून सर्व प्रकारच्या शुल्कांची आकारणी समाविष्ट आहे.

४. आमची निविदा स्वीकृत केल्यास आम्ही कराराच्या संपूर्ण कालवधीत न्यासाने विहीत केल्यानुसार बॅंक गॅरंटी देण्यास आम्ही बांधील आहोत.

५. आम्ही याद्वारे हमी देतो की, शासकीय/निमशासकीय/सार्वजनिक उपक्रम यांनी आमच्या काम करण्यासंदर्भात प्रतिबंधात्मक कारवाई आमच्या विरूध्द केलेली नाही.

६. आम्हास माहित आहे की, निविदा स्वीकृत करण्यासंदर्भात न्यासास संपूर्ण अधिकार आहे. तसेच कोणतेही कारण न देता निविदा नाकारण्याचा अधिकार न्यासास आहे.

७. निविदेसोबतची सर्व कागदपत्रे आम्ही काळजीपूर्वक वाचली असून निविदेतील अटी व शर्ती, अन्य बाबी आम्हांस मान्य असून त्या बंधनकारक आहेत.

**निविदाधारकाची सही व शिक्का**

(सनदी लेखापाल यांच्या लेटरहेडवर)

## वार्षिक आर्थिक उलाढालीबाबतचे प्रमाणपत्र

दाखला देण्यात येतो की, मे. ..........................................................................

..........यांच्या व्यवसायाची वर्ष २०२२–२०२३, २०२३–२०२४, २०२४–२०२५ या आर्थिक वर्षांची उलाढाल खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | कालावधी | वार्षिक आर्थिक उलाढाल |
|---|---|---|
| १ | वर्ष २०२१–२०२२ | .. |
| २ | वर्ष २०२२–२०२३ | |
| ३ | वर्ष २०२३–२०२४ | |
| | एकूण उलाढाल | |

दिनांक :– / / २०२५

ठिकाण :–

सनदी लेखापालाची सही/चार्टर्ड अकाटंन्ट
(नांव/सही शिक्का)

नोंदणी क्रमांक :–

श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई – ४०००२८
S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 (Controlled by Govt. of Maharashtra)
Tel : 022 - 6249 1111, 022 - 6249 1112 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org
mahaprasad@siddhivinayak.org

दिनांक – / / २०२५

## मूळ निविदा (वाणिज्यिक Commercial) BOQ

## चहा व नाष्टा (अल्पोपहार) करीता

निविदामध्ये खालील बाबी अंतर्भूत करण्यात याव्यात.

निविदाधारकाचे नाव

:————————————————————————

निविदाधारकाचा कायमचा पत्ता

:————————————————————————

————————————————————————

निविदाधारकाचा कंपनी नोंदणी क्रमांक :

————————————————————————

जी एस टी क्रमांक :

————————————————————————

| अ.क्र. | तपशील | प्रतिदिन व्यक्तीची अंदाजे संख्या | प्रति कप / प्रति प्लेट दर रक्कम रु. (कर वगळून) |
|---|---|---|---|
| १ | चहा (दोन्ही वेळा मिळून) | ४५० | |
| २ | नाष्टा (अल्पोपहार) | २५० | |

निविदाधारकाची सही व शिक्का

श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई – ४०००२८
S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 (Controlled by Govt. of Maharashtra)
Tel : 022 - 6249 1111, 022 - 6249 1112 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org
mahaprasad@siddhivinayak.org

दिनांक –     /     / २०२५

# मूळ निविदा (वाणिज्यिक Commercial) BOQ

## नियमित भोजन करिता

निविदामध्ये खालील बाबी अंतर्भूत करण्यात याव्यात.

निविदाधारकाचे नाव :————————————————————

निविदाधारकाचा कायमचा पत्ता :————————————————————

————————————————————

निविदाधारकाचा कंपनी नोंदणी क्रमांक : ————————————————————

जी एस टी क्रमांक : ————————————————————

| अ.क्र. | तपशील | प्रतिदिन व्यक्तीची अंदाजे संख्या | प्रति थाळी दर रक्कम रु. (कर वगळून) |
|---|---|---|---|
| १ | नियमित दुपारचे भोजन (अमर्यादित) | २५० | |

निविदाधारकाची सही व शिक्का

श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई – ४०००२८
S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 (Controlled by Govt. of Maharashtra)
Tel : 022 - 6249 1111, 022 - 6249 1112 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org
mahaprasad@siddhivinayak.org

दिनांक – / / २०२५

# मूळ निविदा (वाणिज्यिक Commercial) BOQ

## विशेष भोजन करिता

निविदामध्ये खालील बाबी अंतर्भूत करण्यात याव्यात.

निविदाधारकाचे नाव :________________________________

निविदाधारकाचा कायमचा पत्ता :________________________________

________________________________

निविदाधारकाचा कंपनी नोंदणी क्रमांक : ________________________________

जी एस टी क्रमांक : ________________________________

| अ. क्र. | विशेष भोजन बनविण्यात येणाऱ्या दिवसांचा तपशील | प्रतिदिन व्यक्तीची अंदाजे संख्या | प्रति थाळी दर रक्कम रु. (कर वगळून) |
|---|---|---|---|
| १ | हवन पूजा | हवन दिवशी २५ | |
| | माघ महोत्सव<br>श्री गणेश जयंती व रथसप्तमी या दोन दिवशी | प्रतिदिन १००० | |
| | माघ महोत्सव<br>उर्वरीत ५ दिवस | प्रतिदिन ७५० | |
| | सर्व हिंदू सण | प्रतिदिन २५० | |

निविदाधारकाची सही व शिक्का

श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई - ४०००२८
S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 (Controlled by Govt. of Maharashtra)
Tel : 022 - 6249 1111, 022 - 6249 1112 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org
mahaprasad@siddhivinayak.org

दिनांक — / / २०२५

## मूळ निविदा (वाणिज्यिक Commercial) BOQ

## "श्रीं" चे नैवेद्य तसेच हवन, श्रीसत्यनारायण व श्रीसत्यविनायक पूजेंकरीता

निविदामध्ये खालील बाबी अंतर्भुत करण्यात याव्यात.

निविदाधारकाचे नाव :----------------------------------------

निविदाधारकाचा कायमचा पत्ता :----------------------------------------

----------------------------------------

निविदाधारकाचा कंपनी नोंदणी क्रमांक : ----------------------------------------

जी एस टी क्रमांक : ----------------------------------------

| अ. क्र. | प्रसादाचा तपशील | तपशिल | दर रक्कम रु. (कर वगळून) |
|---|---|---|---|
| १ | श्रीं चा नैवद्य | दररोज ५१ नग उकडीचे मोदक | |
| २ | हवन | प्रति हवन तळलेले लहान आकाराचे ११०० नग मोदक | |
| ३ | श्रीसत्यनारायण पूजा | प्रति पूजा सव्वा किलो रव्याचा शिरा | |
| ४ | श्रीसत्यविनायक पूजा | प्रति पूजा तळलेले मध्यम आकाराचे २१ नग मोदक (उकडीच्या मोदकाच्या आकाराचे) | |

निविदाधारकाची सही व शिक्का

श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई – ४०००२८
S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 (Controlled by Govt. of Maharashtra)
Tel : 022 - 6249 1111, 022 - 6249 1112 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org
mahaprasad@siddhivinayak.org

## ई–निविदा मागविण्याबाबतची माहिती

१) सकाळचा अल्पोपहार व दररोज दुपारचे भोजन बनविण्याच्या कामाचे कंत्राट देण्याकरीता ई–निविदा ऑनलाईन भरावयाची आहे. ई–निविदेबाबतची सविस्तर माहिती (अटी व शर्ती) तसेच निविदा अर्ज डाऊनलोड करण्यासाठी **www.mahatenders.gov.in** या संकेतस्थळावर किंवा **www.siddhivinayak.org** या न्यासाच्या अधिकृत वेबसाईटला भेट द्यावी.

२) अल्पोपहार व भोजन बनविण्याच्या कामाचे कंत्राट देण्याकरीता (पान क्र.    वरील) कागदपत्रे तांत्रिक निविदा (Technical Bid) मध्ये अपलोड करावी. तसेच तांत्रिक निविदा (Technical Bid) च्या प्रत्येक पानावर निविदाधारकाची स्वाक्षरी व संस्थेचा शिक्का असावा.

३) निविदा अपलोड करतेवेळी निविदा शुल्क (Tender Fee) रक्कम रु. १५,०००/– व बयाना रक्कम (EMD) रक्कम रू. १,५०,०००/– इतकी ऑनलाईन इंटरनेट बँकींगमार्फतच जमा करावी लागेल. बयाना रक्कम कंत्राट करार संपल्यावर ६० दिवसानंतर परत केली जाईल. ई–निविदेची किंमत/शुल्क ना परतावा स्वरुपाचे असेल तसेच बयाना रक्कमेवर कोणत्याही प्रकारचे व्याज अनुज्ञेय होणार नाही/मिळणार नाही.

४) निविदा शुल्क रक्कम व बयाना रक्कमेबाबतच्या पावती प्रत अपलोड करावी लागेल. निविदा शुल्काची रक्कम व बयाना रक्कमेशिवाय सादर केलेली निविदा स्विकृत केली जाणार नाही.

५) ऑनलाईन इंटरनेट बँकींगकरीता एस. बी. आय. बँक किंवा इतर इंटरनेट बँकींगकरीता एस. बी. आय. MOPS (Multiple Option Payment System) चा वापर करावा.

६) ई–निविदेसोबत राष्ट्रीयकृत वा अनुसुचित बँकेचा पतदारी दाखला (Solvency Certificate) अपलोड करणे आवश्यक आहे. सदर निविदेच्या अनुषंगाने निविदाकाराने रू. ४० लक्ष इतक्या रकमेचा पतदारी दाखला सादर करावा.

७) स्थानिक सहकारी बँक, पतसंस्था इत्यादीचा धनाकर्ष व धनादेश ग्राहय धरला जाणार नाही.

८) ई–निविदाधारकाने तांत्रिक निविदा (Technical Bid) व बीड ऑफ कोटेशन (BOQ) अशा दोन प्रकारच्या ई–निविदा भरताना काही माहिती अपूर्ण ठेवल्यास/राहिल्यास त्या ई–निविदा कोणतेही कारण न देता रद्द समजण्यात येतील. अंतिम निर्णय हा श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास यांचेसाठी राखीव असेल.

९) ई–निविदेसोबत अपलोड करावयाची कागदपत्रे, आर्थिक उलाढालीबाबतचे निकष, अटी/शर्ती, अल्पोपहार व भोजन बनविण्यासंबंधीची माहिती सोबत दिलेली आहे.

# अटी व शर्ती

१) कंत्राट कालावधीत नमुद केलेले चहा, नाष्टा (अल्पोपहार), नियमित भोजन, विशेष भोजन इ. बनविण्याच्या कंत्राटाचा कालावधी हा कार्यादेशाच्या दिनांकापासून १ वर्षाच्या कालावधीपर्यंत असेल. या कालावधीमध्ये कंत्राटदाराचे काम समाधानकारक नसल्यास तसेच निकृष्ट दर्जाचे काम अथवा कामामध्ये कोणत्याही प्रकारचे गैरवर्तन आढळल्यास, कामाचे कंत्राट तात्काळ रद्द करण्याचा अधिकार न्यास व्यवस्थापन समितीने राखून ठेवलेला आहे.

२) दररोजचा श्रींचा सत्यनारायण पूजेचा प्रसाद, श्रींच्या नैवदयाकरीता दररोज उकडीचे मोदक, हवनाकरीता तळणीचे ११०० मोदक बनविण्याची व्यवस्थाही सदर कंत्राट कालावधीमध्ये कंत्राटदारास करावी लागेल यांची नोंद निविदाधारकांनी निविदा सादर करताना घ्यावी.

३) कंत्राट कालावधीत नमुद केलेले चहा, नाष्टा (अल्पोपहार), नियमित भोजन, विशेष भोजन इ. बनविण्याचे काम नियमित व वेळेतच होण्याकरीता निविदाधारकाचे कार्यक्षेत्र हे मुंबई असावे. त्यादृष्टीने निविदाकाराने मुंबईत कोठेही कॅटरिंगचा व्यवसाय/भोजन पुरवठा केल्याबाबतची कागदपत्रे उदा. बिल/कार्यादेश, पुरवठा आदेश इ. पैकी एक सादर करणे आवश्यक आहे.

४) ई–निविदाधारकास देवस्थान, चॅरीटेबल ट्रस्ट, नामांकित कंपन्या, हॉटेल्स,रूग्णालये,शासकीय कार्यालये ई .ठिकाणी स्वयंपाक, भोजन बनविण्याच्या कामाचा अनुभव असावा.

५) निविदाधारक हा हिंदू असावा.

६) निविदाधारक यांच्याकडे कॅटरींग व्यवसायाचा नामांकित प्राधिकरण/संस्थेचा कमीत कमी ३ वर्षांचा अनुभव असावा. तसेच निविदाधारक संस्थेची कॅटरींग क्षेत्रात मागील ३ वर्षाची सरासरी १ कोटीपेक्षा जास्त उलाढाल असावी.

७) पूर्ण माहिती भरलेली ई–निविदा मुदतीत अपलोड करावयाची जबाबदारी निविदाधारकांवर आहे. मुदतीत न आलेल्या तसेच अपूर्ण ई–निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत. ई–निविदा स्विकारण्याचा अगर नाकारण्याचा अधिकार न्यास व्यवस्थापन समितीने राखून ठेवलेला आहे. त्याबद्दलची कारणे देणे न्यास व्यवस्थापनावर बंधनकारक राहणार नाही.

८) कंत्राट कालावधीत नमुद केलेल्या चहा, नाष्टा (अल्पोपहार), नियमित भोजन, विशेष भोजन इ. बनविण्याच्या प्रमाणापेक्षा जास्त प्रमाणात विशेष प्रसंगी (विविध धार्मिक उत्सव/सण आणि इतर विविध कार्यक्रमादिवशी) अल्पोपहार किंवा भोजन व्यवस्था करण्यात आल्यास सदर वाढीव काम मान्य दराने करणे कंत्राटदारास बंधनकारक राहील.

९) कंत्राट कालावधीत नमुद केलेले चहा, नाष्टा (अल्पोपहार), नियमित भोजन, विशेष भोजन इ. तयार करताना कंत्राटदाराच्या निष्काळजीपणामुळे कोणत्याही प्रकारची जिवीत / वित्तहानी झाल्यास कंत्राटदाराकडून नुकसान भरपाई घेण्यात येईल. सदर रक्कम कंत्राटदाराच्या बिलातून वजा करण्यात येईल.

१०) कंत्राट कालावधीत कंत्राटदाराने स्वयंपाक गृहातील वस्तू व मालमत्ता काळजीपुर्वक तसेच जबाबदारीने वापरणे बंधनकारक असेल. तसेच कंत्राटदाराची भोजन संबंधित सामग्री तथा साहित्य ठेवण्यासाठीची जागा न्यासातर्फे उपलब्ध करुन देण्यात येईल.

११) कंत्राटदाराने संपूर्ण स्वयंपाक गृह, जेवण बनविण्यासाठी वापरण्यात येणारी सर्व भांडी तसेच जेवण संपल्यानंतर पूर्ण स्वयंपाक गृहाची (टेबल, जेवणाची भांडी/ताटे, मोरी ई. ) धुणे / साफसफाई करणे बंधनकारक राहील.

१२) कंत्राट कालावधीत नमुद केलेले चहा, नाष्टा (अल्पोपहार), नियमित भोजन, विशेष भोजन इ. बनविण्यासाठी आचारी, मदतनीस (भाजी साफ करणे, भाजी चिरणे, चपाती बनविण्यासाठी ई.), जेवण वाढण्यासाठी वाढपी तसेच साफसफाई करण्यासाठी लागणारे कर्मचाऱ्यांची यांची संख्या विचारात घेऊन दर सादर करावे.

१३) कंत्राटदाराने नेमलेल्या सर्व कर्मचाऱ्यांच्या आरोग्याची प्राधिकृत वैद्यकीय अधिकारी यांच्याकडून तपासणी करून आरोग्याचा दाखला (Health certificate), तसेच कायम रहिवाशी दाखला व ओळखपत्र म्हणून आधारकार्ड न्यासास सादर करणे आवश्यक आहे.

१४) कंत्राट कालावधीत कार्यरत असणाऱ्या सर्व कामगारांची वैद्यकीय तपासणी प्रत्येक सहा महिन्याला करण्यात यावी. यासाठी होणारा खर्च कंत्राटदाराने करावयाचा असून त्याबाबतच्या वैद्यकीय तपासणी अहवालाची एक प्रत महाप्रसाद विभागाला सादर करावी लागेल.

१५) कंत्राट कालावधीमध्ये सर्व कर्मचाऱ्यांना गणवेश (युनिफॉर्म), हॅन्डग्लोज, शॉवर कॅप, अप्रॉन घालणे बंधनकारक असेल. यासाठी होणारा सर्व खर्च कंत्राटदाराने करावयाचा आहे.

१६) कामाचे कंत्राट अर्धवट सोडून गेल्यास अथवा कंत्राट कालावधीत काम करण्यास नकार दिल्यास निविदाधारकाची बयाना रक्कम जप्त करण्यात येईल व यापुढील न्यासाच्या कामासाठी त्यांना काळया यादीत टाकण्यात येईल.

१७) कंत्राटदाराने नियुक्त केलेल्या सर्व कामगार व कर्मचाऱ्यांची सर्व प्रकारची देणी, त्यांचा नोकरी हक्क व इतर बांधिलकी ही सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

१८) कंत्राटदाराकडून लावण्यात आलेल्या/नेमलेल्या कामगारांची/मजूरांची सुरक्षितता व जबाबदारी कंत्राटदाराची राहील. कामगार कायदा मजूरी अधिनियम आणि कामगार नुकसान भरपाई अधिनियमातील तरतूदीचे पालन करणे कंत्राटदारास बंधनकारक असेल. यासंबंधाने मंदिर न्यास कोणतीही जबाबदारी स्विकारणार नाही.

१९) कंत्राटदाराच्या कर्मचाऱ्यांकडून गैरवर्तन अथवा न्यासाच्या मालमत्तेचे नुकसान झाल्यास नियमाप्रमाणे नुकसान भरपाई घेतली जाईल. कर्मचाऱ्यांकडून कोंणत्याही प्रकारचे गैरवर्तन झाल्यास याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदारावर राहील. कंत्राटी कर्मचारी नियुक्त करतांना त्यांचे पोलीस व्हेरिफिकेशन करून घेणेबाबत संबंधित कंत्राटदारावर बंधनकारक राहील.

२०) कंत्राटदाराने सदरील काम नाकारल्यास अथवा काम न केल्यास आपली पूर्णत:/अंशत: बयाना रक्कम न्यासात जमा करण्यात येईल. त्याबाबत मंदिर न्यास व्यवस्थापनाचा निर्णय अंतिम राहील.

२१) कंत्राट कालावधीत नमुद केलेले चहा, नाष्टा (अल्पोपहार), नियमित भोजन, विशेष भोजन इ. बनविण्याचे दिलेले काम वेळेत न केल्यास, लेखी अथवा मौखिक आदेशानुसार दिलेल्या कामाची पुर्तता न केल्यास, तसेच असमाधानकारक काम केल्यास कंत्राटदारास दिलेले कंत्राट कोणतीही पुर्वसूचना न देता तात्काळ रद्द करण्यात येईल. याबाबत मंदिर न्यास व्यवस्थापन समितीचा निर्णय अंतिम राहिल.

२२) ज्यांची निविदा मान्य होईल त्या कंत्राटदाराने कार्यादेश मिळाल्यापासून १५ दिवसाच्या आत वार्षिक निविदा रक्कमेच्या १०% रक्कम किंवा रू. १० लक्ष यातील जे जास्त असेल ती रक्कम बॅक गॅरेंटी म्हणून १ वर्षासाठी मंदिर न्यासाकडे जमा केली पाहिजे. निविदेसोबत ऑनलाईन इंटरनेट बॅकींगमार्फत सादर केलेली बयाना रक्कम रू. १,५०,०००/– वजा करून उर्वरीत रक्कम जमा करावी लागेल.

२३) निविदाकारास कार्यादेश दिल्यापासून १ महिन्याच्या आत निविदाकाराने समक्ष येवून रू. ५०० च्या स्टॅम्पपेपरवर करारनामा करून देणे निविदाधारकास बंधनकारक राहील. परंतू अशाप्रकारे करारनामा करून दिला नाही अथवा त्याबाबत टाळाटाळ केल्यास सदर निविदेतील अटी व शर्ती या कराराचा भाग समजून करारनामा म्हणून ग्राह्य धरण्यात येईल. त्याबाबत कुठलीही तक्रार चालणार नाही. निविदेतील अटी व शर्ती कराराचा भाग असतील.

२४) सदर निविदेतील कामाच्या अनुषंगाने याबाबतचे देयक न्यास कार्यालयातून अदा होणार असल्यामुळे सदर व्यवहाराबाबत वाद झाल्यास तो मुंबई कोर्टाच्या न्याय कक्षेत राहील.

२५) ई–निविदा भरतांना सर्व प्रकारचे खर्चासह सेवाकर (जी. एस. टी) वगळून रक्कम भरावी.

२६) ई–निविदा सादर करताना एखादे कागदपत्र अनावधनाने अपलोड करावयाचे राहून गेल्यास मा. खरेदी उपसमितीच्या पूर्व मंजुरीने तांत्रिक निविदा उघडताना सदर कागदपत्र सादर करण्याची मूभा असेल. त्यामळे निविदाकाराने सदर निविदा उघडताना सर्व कागदत्रांचा एक संच तपासणीसाठी न्यासास सादर करावा.

२७) कामगार कायद्यानुसार कामाच्या कालावधीमध्ये कंत्राटदार स्वत:च्या खर्चाने कामगार पुरविणार असल्याने त्यांची नियुक्ती करताना न्यासाच्या आस्थापनेशी मालक व नोकर असा संबंध प्रस्थापित होणार/राहणार नाही.

२८) कमी जास्त दराची कोणतीही ई–निविदा स्विकारण्याचा/नाकारण्याचा अथवा ई–निविदा कोणतेही कारण न देता रद्द करण्याचा अधिकार मंदिर न्यासाने राखून ठेवलेला आहे. त्याबद्दलची कारणे, स्पष्टीकरण देणे श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यासास बंधनकारक राहणार नाही.

२९) या कामासाठी लावण्यात येणाऱ्या कामगारांना किमान वेतन अधिनियम १९४८ नुसार द्यावयाचे किमान वेतन, भविष्यनिधी अधिनियम १९५२, (प्रॉव्हीडन्ट फंड ॲक्ट १९५२) नुसार प्रशासकीय चार्जेससह भरावी लागणारी अंशदानाची रक्कम तसेच वर्कमॅन कॉम्पेन्सेशन ॲक्ट १९६१ नुसार नुकसान भरपाई इ. बाबतची सर्व कायदेशीर जबाबदारी निविदाधारकाची राहील. कर्मचारी वेतन कायदा १९३६, कर्मचारी नुकसान भरपाई १९६१, कर्मचारी जबाबदार कायदा १९३८, कर्मचारी नियमीत करणे व काढून टाकणेचा कायदा १९७९ नुसार वेळोवेळी झालेल्या कायदेशीर सुधारणा कंत्राटदारावर बंधनकारक राहतील.

३०) किमान वेतन अधिनियम १९४८ अंतर्गत शॉप ॲण्ड कमर्शियल इस्टॅब्लीशमेंट झोन नं. १ साठी निर्धारित केल्याप्रमाणे कामगार कायद्यातील तरतूदीनुसार अनुज्ञेय असलेले किमान वेतन दराप्रमाणे कंत्राटदारास त्यांच्या कर्मचाऱ्यांना वेतन अदा करणे बंधनकारक राहील.

३१) कंत्राट कालावधीत कंत्राटदारामार्फत नेमणुक करण्यात आलेल्या कर्मचाऱ्याचा कार्यरत असताना कोणत्याही प्रकारचा अपघात झाल्यास त्याची सर्व जबाबदारी कंत्राटदार कंपनीवर राहील. त्यासाठी कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई न्यासाकडे मागता येणार नाही. कंत्राटदार कंपनीमार्फत संबंधितांचा अपघात विमा/जीवन सुरक्षा विमा कंपनीने उतरवून घेणे बंधनकारक राहील.

३२) कंत्राटदार यांचेकडील कामगारांना निवासाची व्यवस्था कंत्राटदारास करावी लागेल. सदरील सेवा मंदिर न्यासाकडून पुरविली जाणार नाही.

३३) कंत्राटदाराकडून कामासाठी लावण्यात येणाऱ्या कामगारांस कामगार नुकसान भरपाई कायद्यानुसार नुकसान भरपाई द्यावयाची झाल्यास त्याबाबत संपूर्ण जबाबदारी कंत्राटदारावर राहील. त्याचप्रमाणे वर्कमेन कॉम्पेन्सेशन अॅक्ट तरतूदीस अनुसरून कंत्राटी कामगारांची विमा पॉलीसी घेणे व सदर विमा पॉलिसीची प्रमाणित प्रत न्यासाकडे १५ दिवसाचे आत दाखल करणे संबंधित कंत्राटदारावर बंधनकारक राहील.

३४) निविदादाराकडून पुरविण्यात येणाऱ्या जेवणाचा दर्जासोबत परिक्षण करण्याचा त्यानुषंगाने अभिप्राय देण्याचा व शिफारस करण्याचा अधिकार न्यासास राहील.

३५) सेवाकर, व्यवसाय कर, भविष्य निर्वाह निधी योजना निधी व अन्य कोणत्याही प्रकारच्या करासंदर्भातील जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

३६) नियमानुसार आवश्यक आयकर रक्कमेची कपात करणेत येईल. तसेच सर्व प्रकारचे कर अदा करणेची जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

३७) मंदिर न्यास प्रशासनाने काम प्रमाणित केल्यानंतर व त्यास मान्यता दिल्यानंतर दरमहा देयकाची अंतिम रक्कम अदा करण्यात येईल.

३८) ई–निविदे मध्ये नमूद केलेल्या कामामध्ये कपात करणे किंवा वाढविणे याचा अधिकार मंदिर न्यासाकडे राहील.

३९) कंत्राट कालावधीत नमुद केलेले चहा, नाष्टा (अल्पोपहार), नियमित भोजन, विशेष भोजन इ. बनविण्याच्या अनुषंगाने कंत्राटदाराकडून नेमण्यात आलेली इन्चार्ज किंवा पर्यवेक्षण करणारी व्यक्ती पूर्ण व्यवस्थापन नियोजन व सर्व कर्मचाऱ्यांवर नियंत्रण ठेवणेसाठी असेल. त्यांनी मंदिर न्यास कार्यालयाच्या व्यवस्थापक/पर्यवेक्षक/सहा. पर्यवेक्षक यांचेबरोबर समन्वय साधला पाहिजे.

४०) ई–निविदेत नमूद केलेल्या कामासाठी कंत्राटदाराने दुसऱ्या उप कंत्राटदारास काम दिल्याचे आढल्यास कंत्राटदाराची निविदा रद्द करून त्याची मंदिर न्यासाकडे जमा असलेली बयाना रक्कम जमा करण्यात येईल.

४१) कंत्राटदाराने सदरील काम करण्यास अनियमितता केल्यास चालढकल करत असल्यास यासंदर्भात कोणत्याही स्वरूपाची तक्रार आल्यास, पडताळणीअंती कंत्राटदार जबाबदार ठरल्यास सदर कामाचे कंत्राट रद्द करण्याचा व बयाना रक्कम जप्त करण्याचा निर्णय न्यासास घेण्याचा अधिकार असेल.

४२) या कंत्राटाबाबत काही वाद उपस्थित झाल्यास तो प्रथम मुंबई कार्यक्षेत्रातील लवादा (आरबीट्रेशन) मार्फत त्यावरून निवाडा करण्यात येईल. लवादामधील निर्णय अमान्य राहिल्यास मुंबई कार्यक्षेत्रातील न्यायालयाकडे जाता येईल.

४३) कंत्राटदारास कोणत्याही शासकीय अथवा निमशासकीय संस्थेमध्ये सदरील कामाच्या अनुषंगाने त्यांना काळया यादीत टाकलेले नाही किंवा त्यांच्याविरुध्द न्यायालयात कोणतेही प्रकरण दाखल झालेले नाही वा प्रलंबित नाही याबाबतचे कायदेशीर हमीपत्र सादर करणे आवश्यक राहील.

४४) नमूद कामाच्या अनुषंगाने स्वयंपाकगृहाची पाहणी करण्याकरीता महाप्रसाद विभागात दिनांक ०१.०८.२०२५ ते १९.०८.२०२५ या कालावधीत सकाळी १०.०० ते दुपारी ४.०० वाजेपर्यंत भेट देऊ शकता.

४५) उपरोक्त शर्ती व अटीत काही बदल, सुधारणा करण्याचा, शिथिल करण्याचा वा जादा अटी शर्ती विहीत करण्याचा अधिकार मंदिर न्यास व्यवस्थापन समितीने राखून ठेवलेला आहे. कंत्राटदाराची कोणतीही अट/अटी न्यासावर बंधनकारक राहणार नाहीत.

४६) ई–निविदामधील अटी शर्तीचा व कागदपत्रांचा तसेच न्यासाच्या संबंधित कामकाजाचा अभ्यास करून ई–निविदा सादर करावी. ई–निविदेसंबंधी काही शंका असेल तर त्यांनी श्री सिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई कार्यालयात संबंधित अधिकारी यांच्याशी भ्रमणध्वनीद्वारे संपर्क करावा.

| | |
|---|---|
| श्रीमती.वीणा पाटिल | ९९३०९४२४२८ |
| डॉ. श्री. संदिप राठोड | ९३२४९९९०९४ |
| श्री. मंगेश कुंटे | ९७०२००२०३४२ |

Vpatil

(कार्यकारी अधिकारी)
श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास,
प्रभादेवी, मुंबई.